# सन 2013-2014 चा शिक्षण-प्रशिक्षण कार्यक्रम आराखडा

**राज्यातील सहकारी संस्थांची संख्या -**

महाराष्ट्र राज्यात सध्या सुमारे 2,00,000 सहकारी संस्था कार्यरत असल्याचे दिसून येते. त्याची विगतवारी खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1. | गृहनिर्माण सहकारी संस्था | 73903 |
| 2. | प्राथमिक सहकारी दूध उत्पा.सह.पतसंस्था . | 26547 |
| 3. | प्राथमिक सहकारी कृषि पतसंस्था | 20235 |
| 4. | नागरी/ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था | 17278 |
| 5 | मजूर सहकारी संस्था | 10285 |
| 6. | पाणीवापर सहकारी संस्था | 9407 |
| 7. | औद्योगिक उत्पादक सहकारी संस्था | 7751 |
| 8. | पगारदार सह.पतसंस्था | 7222 |
| 9. | ग्राहक सहकारी संस्था | 3403 |
| 10. | मत्स्य उत्पादक सहकारी संस्था | 2872 |
| 11. | हातमाग सहकारी संस्था | 1855 |
| 12. | प्राथमिक पणन संस्था | 1426 |
| 13. | नागरी सहकारी बँका | 635 |
| 14. | सहकारी साखर कारखाने | 188 |
| 15 | इतर | 20000 |
| | **एकूण** | **203007** |

वरील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे सभासद ,संचालक ,पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांना शिक्षण -प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातुन संस्थेची गुणात्मक वाढ जोपासणे सुकर होईल.महाराष्ट्र राज्य सहकारी संघ ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे तरतूदी अन्वये नोंदणीकृत सहकारी संस्था असून ती संघीय संस्था म्हणून सन 1918 पासून कार्यरत आहे.महाराष्ट्र राज्य सहकारी संघ ही राज्यातील संस्थांचे सभासद / कर्मचारी गण यांना शिक्षण / प्रशिक्षण देणारी एकमेव राज्यस्तरीय संस्था असून शिक्षण प्रशिक्षण देणे हे या संस्थेचे प्रमुख कार्य आहे.विविध प्रकारच्या सर्व सहकारी संस्थांना प्रशिक्षण दिले जाते.त्यासाठी संघाची राज्यात 13 प्रशिक्षण केंद्रे व जिल्हा स्तरावर 33 जिल्हा सहकारी बोर्डांमार्फत शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविले जातात.सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना प्रशिक्षण देऊ शकणारी ही सध्या राज्यातील एकमेव संस्था असून त्यासाठी लागणारी प्रशिक्षण केंद्रे व मनुष्यबळ या संस्थेकडे आहे.

97 व्या घटना दुरुस्ती अन्वये सहकारी संस्थांतील सभासदांचे शिक्षणाचे महत्व अधोरेखित झाले आहे. महाराष्ट्रातील सहकारी संस्थांचे सभासदांचे शिक्षण-प्रशिक्षण घेणे

सहकारी चळवळीच्या गुणात्मक वाढीच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.सहकारी संस्थांच्या सभासदांना शिक्षण-प्रशिक्षण देणे हे घटनेतील तरतूदी अन्वये अनिवार्य असून ही जबाबदारी आपण सर्वांनी पार पाडणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्था गुणात्मकदृष्टया बळकट होण्यासाठी राज्य सहकारी संघामार्फत सहकारी शिक्षण- प्रशिक्षण कार्यक्रम राबविताना सध्याच्या अभ्यासक्रमामध्ये आमूलाग्र बदल करणे हे तितकेच आवश्यक आहे. त्यासाठी सर्व प्रकारच्या सहकारी

संस्थांचा गरजेवर आधारीत शिक्षण-प्रशिक्षण आराखडा व त्याचे सन 2013-14 चे कॅलेंडर सोबत जोडले आहे.

जिल्हा सहकारी मंडळाच्या माध्यमातून शहरी व ग्रामीण भागातील तसेच गाव,तालुका,जिल्हा पातळीवरील सहकारी संस्थांच्या सभासदांना प्रशिक्षण देणे सुकर होईल. शैक्षणिक कार्यक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक,सामाजिक,सहकार व राजकीय क्षेत्रातील अनेक पातळीवरील कार्यकर्ते, पदाधिकारी, अधिकारी यांचेशी अतूट नाते बोर्डाचे जुळलेले आहे. सातत्याने सहकारी चळवळीच्या निकोप वाढीसाठी व बळकटीबाबत चर्चा होत असते. त्यातून सहकारी संस्थांच्या विकासाला चालना देण्याचे व दिशा देण्याचे कार्य सातत्याने बोर्डाकडून केले जाते.

सहकारी संस्थांच्या अडीअडचणी सोडविणेबाबत व प्रचलित नवीन कार्यपध्दतीच्या धोरणांचे अंमल बजावणी बाबत जिल्हा सहकारी बोर्ड कार्यरत आहे.

जिल्हा सहकारी बोर्ड ही ग्रामीण पातळीवर कामकाज करणा-या प्राथमिक वि.का.सेवा संस्था/प्राथमिक दूध उत्पादक सहकारी संस्था /उपसा जलसिंचन संस्था / मत्स्य संस्था / पाणीवापर सहकारी संस्था इ.संस्थांचे कायम संपर्कात असते.

जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालक गाव पातळीपासून ते जिल्हा पातळीवरील संस्थांवर संचालक,पदाधिकारी म्हणून कार्यरत असतात. त्यामुळे त्यांचा सर्वसामान्य सभासदाबरोबर सतत संपर्क येत असतो. तसेच जिल्हा सहकारी बोर्डाचे सहकार शिक्षणाधिकारी हे ग्रामीण भागातील वि.का.सेवा संस्था, दूध उत्पादक सह.संस्था, पाणीवापर सहकारी संस्था यांच्यासाठी आयोजित केलेल्या विविध प्रकारच्या शैक्षणिक कार्यक्रमातून सतत संपर्क येत असतो. त्यांच्या सलोख्याच्या व सौहार्दपूर्ण संबंधातून सहकारी चळवळीच्या गुणात्मक वाढीसाठी सतत मार्गदर्शन केले जाते. त्यामुळे सर्व प्रकारच्या संस्थांच्या सभासदांचा प्रशिक्षण कार्यक्रम जिल्हा सहकारी बोर्ड उत्तमरित्या पार पाडू शकतील.

**जिल्हा सहकारी बोर्ड शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम गोषवारा सहकारी शिक्षणाधिकारी निहाय**

| अ .क्र. | संस्था प्रकार | कार्यकम संख्या | सभासद | कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| 1 | नागरी सहकारी पतसंस्था | 38 | 33 | 5 |
| 2 | प्राथमिक वि.का.सेवा संस्था | 21 | 18 | 3 |
| 3 | प्राथमिक दूध संस्था | 11 | 10 | 1 |
| 4 | प्राथमिक गृहनिर्माण सह.संस्था | 05 | 5 | - |
| 5 | पाणीवापर व उपसा जलसिंचन | 02 | 2 | - |
| 6 | मजूर सहकारी संस्था | 01 | 7 | - |
| 7 | औद्योगिक बलुतेदार सह.संस्था | 05 | 5 | - |
| 8 | पगारदार सहकारी संस्था | 01 | 1 | - |
| 9 | ग्राहक सहकारी संस्था | 02 | 2 | - |
| 10 | मत्स्य सहकारी संस्था | 03 | 3 | - |
| 11 | पणन प्रक्रिया सह.संस्था | 01 | 1 | - |
| 12 | यंत्रमाग व हातमाग सह.संस्था | 01 | 1 | - |
| 13 | जिल्हा मध्य.सह.बँक | 01 | - | 1 |
| 14 | नागरी सह.बँक | 02 | - | 2 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 15 | सहकारी साखर कारखाने | 06 | 6 | - |
| 16 | सहकारी सूतगिरण्या | 03 | 3 | - |
| | **एकूण** | **103** | **91** | **12** |

## महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मुख्यालय सन 2013-2014 चे संभाव्य प्रशिक्षण कार्यक्रम

| **अ.क्र.** | **तपशिल** | **कार्यक्रम संख्या** | **दिवस** |
|---|---|---|---|
| 1 | मु.का. अ./ कार्यकारी संचालक -नागरी बँक | 4 | 1 |
| 2 | कार्यकारी संचालक / सर व्यवस्थापक जिल्हा बँक | 2 | 1 |
| 3 | व्यवस्थापक ( कर्जे ) जिल्हा बँक | 2 | 2 |
| 4 | व्यवस्थापक ( वसूली ) जिल्हा बँक | 2 | 2 |
| 5 | मास्टर ट्रेनर्स ट्रेनिंग प्रोग्राम ( जिल्हा बँक )/ बोर्ड / केंद्र | 4 | 3 |
| 6 | सहकार शिक्षणाधिकारी | 2 | 2 |
| 7 | जिल्हा सहकार विकास अधिकारी | 2 | 1 |
| 8 | कार्यकारी संचालक साखर कारखाना | 4 | 1 |
| 9 | कार्यकारी संचालक सुतगिरणी | 4 | 1 |
| 10 | व्यवस्थापक नागरी पतसंस्था | 1 | 2 |
| 11 | व्यवस्थापक कर्मचारी पतसंस्था | 5 | 2 |
| 12 | व्यवस्थापक पणन / प्रक्रिया / ग्राहक | 2 | 1 |
| 13 | अध्यक्ष / उपाध्यक्ष नागरी सहकारी बँक | 2 | 1 |
| 14 | अध्यक्ष / उपाध्यक्ष जिल्हा बँक | 1 | 1 |
| 15 | शाखा व्यवस्थापक नागरी बँक | 4 | 2 |
| 16 | शाखा व्यवस्थापक जिल्हा बँक | 4 | 2 |
| 17 | व्यवस्थापक जिल्हा मजूर संघ | 1 | 2 |
| 18 | व्यवस्थापक जिल्हा / तालुका दुध संघ | 1 | 2 |
| 19 | सचिव / उपसचिव बाजार समिती | 4 | 2 |
| 20 | जिल्हा उपनिबंधक /उपनिबंधक | 2 | 1 |
| 21 | जिल्हा विशेष लेखापरिक्षक | 2 | 1 |
| | | 55 | 33 |